**सर्व साधारण बदल्या सन२०२०**
**अत्यंत महत्वाचे / कालमर्यादीत**

९८८४

जाक्र/जिपवा/साप्रवि/स्था-१/ / २०
कार्यालय जिल्हा परिषद, वाशिम
दिनांकः- ९-६-2020

प्रति,

१. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम
२. प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा वाशिम
३. खातेप्रमुख------------------ - - - - - - - - - - ---(सर्व)जि.प.वाशिम

**विषयः- सर्वसाधारण बदल्या सन २०२० बाबत.**

**संदर्भः-** १)शासन निर्णय क्र.जिपब-४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४ दिनांक १५ मे २०१४.
२)शासन निर्णय क्र.जिपब-४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४दिनांक २ जुलै २०१४.
३)मा.अवर सचिव,महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. १३८ / १६ दि. २२/४/२०१६
४) या कार्यालयाचे पत्र क्र.जाक्र/जिपवा/साप्रवि/आस्था१/११४३/२० दि.३०/४/२०२०
५) कक्ष अधिकारी महाराष्ट्र शान ग्राम विकास विभाग मुबई यांचे प९ क्र. संकीर्ण -२०२०/ प्र.क्र. २८२ आस्था-१४ दि. १९/५/२०२०
६) वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. अर्थसं ३ २०२० / प्र.क्र.६५ /अर्थ -३ दि.४ मे २०२०
७)समान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही -२०२० / प्र.क्र. ३०/ कार्या १२ दि.७/७/२०२०
८) ग्राम विकास विभाग यांचे पत्र क्र.संकीर्ण २०२० / प्र.क्र. २८२/ आस्था-१४ दि.९/७/२०२०

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयानुसार शासनाच्या ग्राम विकास व जलसंधारण विभागाने जिल्हा परिषदेच्या कर्मचा-यांचे सर्वसाधारण बदल्याची कार्यवाही वेळेच्या वेळी होणेचे दुष्टीने सुधारीत कार्यपध्दती विषद केलेली आहे.

संदर्भ क्र. ४ नुसार कोविड-१९ मुळे राज्यात लॉकडाऊन सुरु असल्यामुळे व संर्वसाधारण बदली संदर्भात कोणतेही आदेश प्राप्त नसल्यामुळे आपणास आपले विभाग अंतर्गत अधिनिस्त संवर्गाची बदलीस पात्र कर्मचा-याची वास्तव्य सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करुण आक्षेपा मागविणेस्तव आदेशीत करण्यात आलेले होते.

संदर्भ क्र. ५ नुसार मधिल मु.क्र. १५ नुसार कारोना महामारीच्या अनुषंगाणे करण्यात आलेल्या विविध विभागा अंतर्गतच्या उपाययोजने मध्ये सातत्य राखणे गरजेचे आहे हि बाब लक्षात घेवून चालु वित्तीय वर्षात कोणत्याही संवर्गाची अधिकारी / कर्मचारी यांच्या बदल्या करण्यात येवू नये या अनुषंगाणे सविस्तर आदेश समान्य प्रशासन विभागा मार्फत देण्यात येत आहे असे नमुद आहे. तसेच संदर्भ क्र. ६ अन्वये राज्यातील सर्व जि.प. मधिल सर्व पदाना शासन निर्णय दिनांक ४ मे २०२० मधिल आदेश लागु असल्याने त्याची काटेकोर अमलबजावणी करावी असे निदेर्श आहे.

संदर्भीय शासन निर्णय ७ मधिल चालु वित्तीय वर्षात ३१ मे २०२० पर्यत करावयाच्या सर्वसाधारण बदल्या या दिनांक ३१ जुलै २०२० पर्यत करण्यात याव्यात असे निदेर्श आहेत.त्याच प्रमाणे संदर्भीय पत्र क्र. ८ नुसार शासन निर्णय दि. १५ मे २०१४ च्या शासन निर्णयातील तरतुदी नुसार तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या

दि.७/७/२०२० च्या शासन निर्णयात नमुद करण्यात आलेल्या कालावधीत व १५ टक्के मर्यादेत करण्यात याव्यात असे निदेश आहेत.

करिता या पत्रान्वये सर्व विभाग प्रमुख यांना सुचीत करण्यात येते की, संदर्भीय पत्र क्र. ४ मध्ये दिलेल्या निदशानुसार सर्व विभागानी तात्पुरती सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करुण आक्षेप मागविणेस्तव आदेशित केलेले असल्यामुळे शासन निर्णय दिनांक १५ मे २०१४ मधील निर्देशानुसार जिल्हा परिषद अंतर्गत विविध संवर्गाची बदली प्रक्रिय राबविणेस्तव खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

| अ.क्र. | विषय | दिनांक |
|---|---|---|
| १ | जि.प.स्तर आक्षेप व सुचनांचे निराकरण करुन अंतिम सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द करणे | १४/७/२०२० पर्यत |
| २ | आपशी / विनंतीवरुण अर्ज मागविणे | १६/७/२०२० पर्यत |
| ३ | जि.प.स्तर सर्वसा धारण बदली वेळापत्रक | स्वतंत्र पत्र निगर्मीत करण्यातयेईल |

सर्व खाते प्रमुखानी वरील प्रमाणे शासन निर्णय व परिपत्रका मधील तरतुदी नुसार तात्काळ कार्यवाही करावी.करिता माहीती व पुढी कार्यवाहीस्तव.

९/०७/२०

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,वाशिम

प्रतिलीपी :-

१. मा.अध्यक्ष / उपाध्यक्ष जि.प. वाशिम यांना माहीतीस्तव सविनय सादर.
२. गट विकास अधिकारी पंचायत समिती ----------------- (सर्व ) यांना माहीती व कार्यवाहीस्तव रवाना. आपण आपले स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करावी.

९/०७/२०

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,वाशिम